# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
## मा.इ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - ५
## सभावृत्तांत

**दिनांक - ०३/०८/२०१८** **वेळ -सकाळी ११. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार **दिनांक - ०३/०८/२०१८** रोजी **सकाळी ११. ०० वा.** इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.श्रीम.भिमाबाई पोपट फुगे **-** **अध्यक्षा**
२) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)
३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
४) मा.घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन
५) मा.गायकवाड निर्मला मनोज
६) मा.श्रीम.बारसे प्रियांका प्रविण
७) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
८) मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
९) मा.श्री.बुर्डे अजित प्रताप - स्विकृत सदस्य
१०) मा.श्री.लांडे विजय नामदेव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, श्री.निकम मोहन-लेखाधिकारी तथा प्र.प्रशासन अधिकारी, श्री.जीवन गायकवाड-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.प्रविण घोडे-कार्यकारी अभियंता (विद्युत),मा.पवार - कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री.संजय भोसले- कार्यकारी अभियंता (जलनि:सारण), श्री.डी.डी.गवळी-उपअभियंता (जलनि:सारण), श्री.बी.पी.लांडे उपअभियंता (विद्युत). श्री.रामेश्वर बा.मोहाडीकर उपअभियंता (पर्यावरण), श्री.प्रभाकर तावरे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.अ.व.गुमास्ते - प्र.मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.डामसे आर.पी.मलेरिया निरीक्षक, श्री.क्षीरसागर आर.व्ही.-क.अभियंता (स्थापत्य.), श्री.कोतकर पी.बी.-क.अभियंता (पाणीपुरवठा),श्री.बेळगांवकर सुनिल एस. - क.अभियंता (पाणीपुरवठा), श्री.पवार वैभव –क.अभियंता (विद्युत), श्री.शितोळे एस.बी. क.अभियंता (ज.नि.), श्री.शेलार ए.बी.- क.अभियंता (ज.नि.), श्री.एस.व्ही.बगाडे- सहा.उद्यान अधिक्षक, श्री.म्हेत्रे एच.जे.- उद्यान सहाय्यक, श्री.डी.डी.सटाणे उद्यान सहाय्यक, (उद्यान) श्री.कोंढरे एस.आर.- कार्या.अधिक्षक (अतिक्रमण क व इ), श्री.लांडगे एस.एन.मुख्यलिपिक (अतिकमण), श्री.जाधव आर.डी.मुख्य लिपिक (झोनिपू),श्री.फुगे एन.जे. प्र.क्रीडा पर्यवेक्षक,श्रीम.भोज जे.एस. क्रीडा पर्यवेक्षक, श्री.साळुंके जे.जे.- मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी, श्री.गरदडे ए. एम. सहा.शिक्षक मा. वि .लांडेवाडी,

-------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.** **------**

**विषय क्रमांक** १.लहुजी साळवे मागासवर्गीय सामाजिक संस्था यांना Pay & Use या तत्वावर जागा उपलब्ध करुन देऊन स्वखर्चाने शौचालय बांधण्यास परवानगी देणेबाबत... मा.सागर बाळासाहेब गवळी यांचे पत्र.

**विषय क्रमांक** २.वहिलेनगर चौक नामकरण पिं.चि.म.न.ना.नियमानुसार मान्यता मिळणेबाबत. मा.लक्ष्मण सोपान सस्ते याचे दिनांक ०२/०८/१८ चे पत्र.

**विषय क्रमांक** ३.प्रभाग क्र.७ मधील छत्रपती शिवाजी महाराज प्राथमिक विद्यालय आवारातील वापरात नसलेले व जुने पडझड झालेले शौचालय व मुतारी पाडून आरोग्य कार्यालय बांधणेबाबत. मा.भिमाबाई पोपट फुगे यांचे पत्र.

**विषय क्रमांक** ४.गव्हाणेवस्ती वॉर्ड क्र. ७ मधील प्रभूरामचंद्र सभागृहाजवळील सार्व. शौचालय निष्कासीत करणे. मा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांचे पत्र.

-------

अ) दिनांक ०६/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ४ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-------**

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक- १

दिनांक- - ०३/०८/२०१८

सूचक- मा.प्रियांका बारसे अनुमोदक – मा.प्रा.सोनाली गव्हाणे

संदर्भ - लहुजी साळवे मागासवर्गीय सामाजिक संस्था यांना Pay & Use या तत्वावर जागा उपलब्ध करुन देऊन स्वखर्चाने शौचालय बांधण्यास परवानगी देणेबाबत... मा.सागर बाळासाहेब गवळी यांचे पत्र.

भोसरी पी.एम.टी.चौक या ठिकाणी Fly Over खाली सार्वजनिक शौचालय बांधणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी लोकांची आवक जावक मोठया प्रमाणात आहे. फळ भाजीपाला विक्रेते, बाजारपेठ या परिसरा मोठया प्रमाणात असलेने सार्वजनिक शौचालयाची उपलब्धता नाही. ती गैरसोय दूर करण्यासाठी याठिकाणी अद्यावत सार्वजनिक शौचलय Pay & Use या तत्वावर बांधण्यासाठी संमती दर्शविली आहे. तरी सदर सस्थेस स्वखर्चाने शौचालय बांधण्यासाठी परवानगी देण्याबाबतचा विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

**------**

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक- २

दिनांक- - ०३/०८/२०१८

सूचक- मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.प्रियांका बारसे

संदर्भ - वहिले नगर चौक नामकरण पिं.चि.म.न.ना.नियमानुसार मान्यता मिळणेबाबत. मा.लक्ष्मण सोपान सस्ते याचे दिनांक ०२/०८/१८ चे पत्र.

देहू आळंदी रोड वरील डूडूळगांव गावामध्ये जाणा-या चौकाला वहिलेनगर चौक असे पिं.चि.म.न.ना.नियमानुसार नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक- ३

दिनांक- ०३/०८/२०१८

सूचक- मा.लक्ष्मणशेठ सस्ते अनुमोदक – मा. घुले (नानी) हिराबाई

संदर्भ - प्रभाग क्र.७ मधील छत्रपती शिवाजी महाराज प्राथमिक विद्यालय आवारातील वापरात नसलेले व जुने पडझड झालेले शौचालय व मुतारी पाडून आरोग्य कार्यालय बांधणेबाबत. मा.भिमाबाई पोपट फुगे यांचे पत्र.

वरील विषयानुसार म.न.पा. शाळेतील जुने आणि वापरात नसलेले शौचालय पाडून त्याजागी आरोग्य कार्यालयासाठी सदरचे ठिकाण सुव्यवस्थित करणेस मान्यता देणेत आली आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक -१८ विषय क्रमांक- ४

दिनांक- - दिनांक- - ०३/०८/२०१८

सूचक- मा. सोनाली गव्हाणे अनुमोदक – मा.निर्मला गायकवाड

संदर्भ - गव्हाणेवस्ती वॉर्ड क्र. ७ मधील प्रभूरामचंद्र सभागृहाजवळील सार्व. शौचालय निष्कासीत करणे. मा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांचे पत्र.

वॉर्ड क्र. ७ मधील प्रभूरामचंद्र सभागृहाशेजारी म.न.पा.चे सार्व.शौचालय वापरात नाही. सदरचे शौचालय जुने आहे. सदर शौचालय पाडण्यात यावे. सदर परिसरात नागरीकांनी वैयक्तिक शौचालय सुविधा आहेत. त्यामुळे नागरीकांना सार्व. शौचालयाची आवश्यकता नाही. तरी जुने शौचालय पाडून टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------

**मा. अध्यक्ष -** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र-इक्षेका/कावि/४/१६८/२०१८
दिनांक- २१/०७/२०१८.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

सभावृत्तांतील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.